# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

# जून २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ✯ | Post Graduate Institute | 01 |
| ❁ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✿ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७९१/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

जून २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५४, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महाबळेश्वर येथील अतिथीगृहाचे भूमिपूजन कृषिमंत्री मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या शुभहस्ते संपन्न





**दि. १५ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्र, महाबळेश्वर येथे नव्याने उभारण्यात येत असलेल्या अतिथीगृहाचे भूमिपूजन कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे प्रति कुलपती मा. ना. माणिकराव कोकाटे यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणेचे उपाध्यक्ष मा. श्री.तुषार पवार, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, गहू गेरवा कवकशास्त्रज्ञ डॉ. दर्शन कदम, गहू रोगशास्त्रज्ञ डॉ. मनीष सुशीर, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. विक्रांत साळी, जिल्हा कृषि अधिकारी श्रीमती भाग्यश्री फरांदे तसेच कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथील अधिकारी कर्मचाऱ्यासह मान्यवर उपस्थित होते.

यात्प्रसंगी कृषिमंत्री मा. ना.श्री माणिकराव कोकाटे मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाबळेश्वर येथील विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्रामध्ये गव्हाच्या रोगावर संशोधन सुरू आहे. याचबरोबर आता स्ट्रॉबेरी संशोधनास देखील मान्यता मिळाली असून त्याचे देखील काम सुरु आहे. लवकरात लवकर येथील केंद्र अद्ययावत करून शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. यात्प्रसंगी डॉ. दर्शन कदम अधिक माहिती देताना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्राच्या माध्यमातून उभारण्यात येणारे हे अतिथीगृह महाराष्ट्र तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील शास्त्रज्ञ,आंतरराष्ट्रीय मका आणि गहू सुधारणा केंद्र, (CIMMYT) मेक्सिको येथील गहू तांबेरा शास्त्रज्ञ रोगावर आणि स्ट्रॉबेरी वर काम करणारे शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यासाठी उपयोगी येणार आहे. यावेळी गहू गेरवा संशोधन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास कृषिमंत्री मा.आ.ॲड. माणिकराव कोकाटे यांची भेट





**दि. २ जून, २०२५.** महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा. आ. ॲड. माणिकराव कोकाटे यांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथे कार्यरत असलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट दिली. भेटीदरम्यान कृषिमंत्र्यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या विविध प्रयोगांची, संशोधन प्रकल्पांची आणि इतर कामांची माहिती घेतली. भारतातील सर्वाधिक दूध देणाऱ्या देशी गायी तसेच महाराष्ट्रातील विविध देशी गायींची त्यांनी

पाहणी केली. या गायींचे वैशिष्ट्य, दूध उत्पादनाची क्षमता आणि त्यांच्या संवर्धनासाठी सुरू असलेले प्रयत्न पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रकल्पामध्ये आयओटी (IoT) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करून तयार करण्यात आलेल्या विविध ॲप्लिकेशन्सचीही माहिती कृषि मंत्र्यांना देण्यात आली. या भेटीवेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार आणि प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने उपस्थित होते. यावेळी डॉ. माने यांनी संपूर्ण प्रकल्पाची सविस्तर माहिती कृषिमंत्र्यांना दिली. सदर भेटीदरम्यान प्रकल्पाचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कणखरे, सहशास्त्रज्ञ डॉ. संदीप पोळ, सहशास्त्रज्ञ डॉ. सुजित भालेराव, डेअरी मॅनेजर सौ. विद्या पिंपरकर तसेच सर्व कृषि सहाय्यक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात नेत्रदान कार्यक्रम संपन्न



**दि. २३ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय व शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. नानासाहेब पवार सभागृहात नेत्रदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साई सूर्य नेत्रसेवेच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया या प्रमुख व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भनगे व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

याप्रसंगी मा. डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की डोळे ही ईश्वराने दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. आपल्या देशात काही व्यक्ती या जन्मजात अंध असतात तर काही अपघाताने आपली दृष्टी गमावतात. या सर्व अंध व्यक्तींच्या जीवनात जर खरोखर प्रकाशमय आनंद आणायचा असेल तर आपण या मरणोत्तर दृष्टिदानाच्या संकल्पाने आणू शकतो. आपण या जगातून गेल्यानंतर सुद्धा जिवंत राहायचे असेल तर मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला पाहिजे. त्यामुळे अंधांची वाटचाल सुखकर होईल. यावेळी डॉ. सुधा कांकरिया यांनी डोळ्यांची रचना, कार्य, डोळ्यांचे आजार, घ्यावयाची काळजी व नेत्रदानाविषयीचे अज्ञान व अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सुधा कांकरिया यांनी उपस्थित सर्वांना नेत्रदानाविषयी शपथ दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. साताप्पा खरबडे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी केल तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, पदव्युत्तर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठात विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक संपन्न

**दि. १७ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक खरीप २०२५ चे आयोजन डॉ. नानासाहेब पवार सभागृहात करण्यात आले होते. यावेळी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. यावेळी राज्याचे कृषि आयुक्त

डॉ. सुरज मांढरे ऑनलाईन उपस्थित होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर श्री. अजय कुलकर्णी, विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक श्री. सुभाष काटकर व विभागीय कृषि सहसंचालक, पुणे श्री. दत्तात्रेय गवसाने उपस्थित होते.



मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की कृषि विद्यापीठांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा प्रसार क्लस्टरच्या माध्यमातून प्रभावीपणे होईल. यासाठी एक क्लस्टर निवडून तसेच एका पिकाची निवड करून त्या पिकाचे बियाण्यासह सर्व तंत्रज्ञान तेथील शेतकऱ्यांना पुरवावे लागेल. विद्यापीठाचे तंत्रज्ञान जलद प्रसारासाठी क्लस्टरचा उपयोग प्रभावी ठरेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे असेल तर उत्पादनात वाढ झाली पाहिजे. यासाठी उत्पादन खर्चात बचत करावी लागेल. तणनाशकाचा प्रभावी वापर केल्यामुळे खुरपणीवर होणारा खर्च वाचेल. त्यासोबतच मूल्यवर्धनाची साखळी तयार करावी लागेल. विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पद्धतीच्या मॉडेलचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात वाढ होईल व खऱ्या अर्थाने शेती शाश्वत होईल असे यावेळी ते म्हणाले. मा. कृषि आयुक्त डॉ. सुरज मांढरे आपल्या ऑनलाईन मार्गदर्शनात म्हणाले की आपल्याला शेती व शेतकऱ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा लागेल. जोपर्यंत आपण शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात समाधान आणत नाही तोपर्यंत आपण यशस्वी झालो असे म्हणता येणार नाही. पर्यावरणातील चढ उतार शेतीवर विपरीत परिणाम करीत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल हे आपण पाहिले पाहिजे. हॅकथोनमध्ये सहभागी झालेल्या प्रयोगशील व्यक्तींनी शेतीमध्ये नवनवीन संशोधन केले आहे. ते संशोधन विद्यापीठातील संशोधनासाठी कसे फलदायी ठरेल हे पहावे लागेल.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी सन २०२५ मधील प्रसारित वाण, अवजारे व शिफारशी यांचा अहवाल सादर केला. डॉ. गोरक्ष ससाणे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विस्तार उपक्रम अहवाल २०२५ चे सादरीकरण केले. यावेळी डॉ. उत्तम कदम यांनी खरीप पिकांचे कीड व्यवस्थापन, डॉ. रवींद्र गायकवाड यांनी खरीप पिकांचे रोग व्यवस्थापन व विद्यापीठ विकसित नाविन्यपूर्ण उत्पादन फुले सुपर बायोमिक्स, डॉ. नरेंद्र काशीद यांनी सुधारित भात पीक उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. श्रद्धा बगाडे यांनी खरीप हंगामाकरिता हवामान आधारित नियोजन, डॉ. सुरेश दोडके यांनी खरीप कडधान्य पीक उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. पवन कुलवाल यांनी कापूस पीक उत्पादन तंत्रज्ञान, तसेच महाबीजचे जालना येथील विभागीय व्यवस्थापक, श्री. सुनील दौंड यांनी बियाणे उपलब्धता, डॉ. अनिल दुरगुडे यांनी जमीन आरोग्य व्यवस्थापन, डॉ. मिलिंद देशमुख यांनी खरीप सोयाबीन पीक उत्पादन तंत्रज्ञान, यावर मार्गदर्शन केले. विभागीय खरीप अहवाल व विद्यापीठ शिफारशी प्रत्याभरण सादरीकरण श्री. अजय कुलकर्णी, श्री. सुभाष काटकर व श्री. दत्तात्रेय गवसाने यांनी केले. यावेळी झालेल्या खरीप हंगामाचे नियोजन व प्रत्याभरण व सुसंवाद कार्यक्रमात सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, सर्व संबंधित पीक विशेषज्ञ, विभागीय विस्तार केंद्राचे अधिकारी, जिल्हा विस्तार केंद्र व कृषि विज्ञान केंद्राचे अधिकारी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ व राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लि., मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार संपन्न

**दि. २६ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि., मुंबई यांच्यामध्ये आरसीएफ, मुंबई येथे द्विपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख ऑनलाईन पध्दतीने

वर्ष :५५, अंक क्रं. : ५४, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

उपस्थित होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्सचे मुख्य महाव्यवस्थापक (विपणन) श्री. एन. के. कामत यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेडच्या संचालिका (तंत्रज्ञान) सौ. रीतू गोस्वामी, आरसीएफच्या कार्यकारी संचालिका (विपणन) सौ. सुनेत्रा कांबळे, आरसीएफचे महाव्यवस्थापक (कार्पोरेट संप्रेषण व सी.एस.आर.) श्री. मधुकर पाचारणे, मुख्य व्यवस्थापिका (संशोधन व विकास) डॉ. अर्चना काळे व आरसीएफ सल्लागार श्री. दिनेश खामकर उपस्थित होते.



याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख ऑनलाईन मार्गदर्शन करतांना म्हणाले की बदलत्या हवामान परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्यासाठी आपल्याला उत्पादन खर्च कमी करावा लागेल. जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे व्यवस्थापन करावे लागेल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेले शाश्वत पीक उत्पादनाचे आधुनिक तंत्रज्ञान आरसीएफच्या मदतीने शेतकऱ्यांच्या शेतावर प्रभावीपणे पोहोचण्यासाठी संयुक्त संशोधन, शिक्षण व विस्तार कार्यक्रम विषयक उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. या सामंजस्य कराराचा विषय शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संतुलित खतांचा वापर, सेंद्रिय पदार्थ आणि जमीन आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी संयुक्त संशोधन, शिक्षण, विस्तार कार्य व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून वैज्ञानिक कौशल्य व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे आदान प्रदान हा आहे. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के, सौ. रितू गोस्वामी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा सामंजस्य करार घडवून आणण्यासाठी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, मृद विज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. अविनाश गोसावी व सहयोगी प्राध्यापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मौजे राळेगण सिध्दी येथे विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत कार्यक्रम संपन्न



**दि. ६ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर व पारनेर कृषि विभाग यांच्या समन्वयाने विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत मौजे राळेगण सिध्दी ता. पारनेर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, राळेगणसिद्धी गावचे सरपंच श्री. लाभेश औटी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील विषय

वर्ष :५, अंक क्र. : ५६, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

विशेषज्ञ प्रा. अन्सार आत्तार, किटकशास्त्रज्ञ डॉ. रणजीत कडू, बाभळेश्वर येथील कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ श्री. घुले, श्री. सोनवणे व पारनेरचे तालुका कृषि अधिकारी श्री. गजानन घुले, मंडल कृषि अधिकारी श्री. जालिंदर गांगर्डे, उपकृषि अधिकारी श्री. साठे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. देवेंद्र जाधव व सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती मयुरी मनतकार उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की विकसित कृषि संकल्प अभियान हा केंद्र सरकारचा एक स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमामध्ये कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभाग, कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या यंत्रणा एकत्र येऊन शेतकऱ्यांना गावांमध्ये जाऊन मार्गदर्शन करत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या काय समस्या आहेत हे या उपक्रमातील अधिकारी जाणून घेतात. यामुळे विकसित कृषि संकल्प अभियान शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे. याप्रसंगी राळेगणसिद्धी या ठिकाणी पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी यावेळी विकसित कृषि संकल्प अभियानाला शुभेच्छा दिल्या. यावेळी शेतकऱ्यांना खरीप हंगाम नियोजन बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रा.आत्तार, डॉ. कडू, श्री. घुले व श्री. सोनवणे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सोयाबीन, मका, मुग, तुर, पिकांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन केले. यावेळी सोयाबीन उगवण क्षमता चाचणी व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या कार्यक्रमासाठी राळेगणसिद्धी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मा. कुलगुरु यांची विविध संशोधन केंद्रे, कृषि महाविद्यालये व तंत्र विद्यालयांना भेटी

### पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयाला मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची भेट




**दि. २७ जून, २०२५.** मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयाला भेट दिली. यावेळी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि तंत्र शिक्षण घेणारे विद्यार्थी यांना कृषि आणि संलग्न व्यवसायाचे कौशल्य आधारित शिक्षण मिळणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ प्रयत्नशील आहे आणि यातूनच विद्यार्थ्यांमधील कृषि उद्योजकतेला चालना मिळेल. कृषि तंत्र विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकल्पाद्वारे व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न कृषि विद्यापीठ करत आहे. विद्यार्थ्यांसाठी दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, गांडूळ खत निर्मिती, मुरघास उत्पादन तसेच भाजीपाला उत्पादन, रोपवाटिका, रेशीमपालन यासारखे प्रकल्प विकसित करून विद्यार्थ्यांना भविष्यात स्वयंपूर्ण रोजगार मिळू शकेल. मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषि तंत्र विद्यालयातील व्याख्यान कक्ष, बीजप्रक्रिया केंद्र, मुलांचे तसेच मुलींचे वसतीगृह तसेच डेअरी प्रकल्प, कांदा बियाणे रोपवाटिका आणि बिजोत्पादन प्रक्षेत्राला भेटी देऊन महत्त्वाच्या सूचना केल्या आणि मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि सौ. गडाख यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सुरुवातीला प्राचार्य डॉ. पंडित खर्डे यांनी कृषि तंत्र विद्यालयाच्या उपक्रमांचे सादरीकरण केले. या भेटीदरम्यान कृषि तंत्र विद्यालय येथील श्री. सोमनाथ लंघे, श्री. किशोर भाकरे, श्री. दिनेश पंडित, श्री. अंबादास इंगळे, श्री. सचिन राऊत आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

जून २०२५



## कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची छत्रपति शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी मालेगाव येथे भेट





**दि. २२ जून, २०२५.** छत्रपति शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी भेट दिली. याप्रसंगी संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, प्राध्यापक डॉ. एस. पी. सोनावणे, कृषि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विवेक कानवडे, कुलमंत्री डॉ. संजय पाटील, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. दिनेश बिरारी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. राहुल खुळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनावणे, सहाय्यक कुलसचिव श्री.नारायण पाठक उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की योग ही संपूर्ण जगाला भारताने दिलेली अमूल्य अशी देणगी आहे. प्रत्येकाने आपले जीवन सुदृढ आणि समृद्ध बनवायचे असेल तर आपल्या जीवनात योगाचा अंतर्भाव असायला हवा. दररोज योग केल्यामुळे शरीर व मनाचे स्वास्थ्य चांगले राहून जीवन आनंदी होते. यासाठी योग गरजेचा आहे. यावेळी सकाळच्या सत्रात योगाभ्यास ठेवण्यात आला. यानंतर त्यांनी संकुलाच्या विविध शैक्षणिक, प्रशासकीय व प्रयोगात्मक प्रक्षेत्रांना भेटी देऊन आढावा घेतला. यावेळी कुलगुरु डॉ. गडाख यांनी नव्याने बांधलेले विद्यार्थ्यांचे वसतिगृह, डिजिटल प्रदर्शन प्रणालीचे उद्घाटन तसेच वृक्षारोपण करण्यात आले. संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे यांनी संकुलाबद्दलचा प्रगती अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय पाटील यांनी तर कार्यक्रमाचे आभार डॉ. दिनेश बिरारी यांनी मानले. यावेळी कृषि विज्ञान संकुल अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची धुळे कृषि महाविद्यालयाला सदिच्छा भेट





**दिनांक २० जून २०२५.**महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. शरद गडाख यांनी धुळे कृषि महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे यांनी त्यांचे स्वागत केले आणि महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध शैक्षणिक,

संशोधन व विस्तार कार्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पशुशास्त्र व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. आर.जे. देसले यांनी केले. या भेटीदरम्यान मा. कुलगुरु डॉ. गडाख यांनी कृषि महाविद्यालयातील विविध विभागांना भेट देऊन त्यांच्या कार्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी बाजरी संशोधन योजना, कृषि विज्ञान केंद्र आणि कृषि तंत्र विद्यालय, धुळे या प्रकल्पांनाही भेटी दिल्या. यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रा. जितेंद्र सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भेट






**दि. २० जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरला भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी महाविद्यालयाच्या कामकाज आणि उपक्रमांविषयी माहिती दिली. या भेटी दरम्यान मा. कुलगुरू डॉ. गडाख यांनी उपस्थितांना संबोधीत करतांना कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर च्या विकासासाठी प्राधान्याने आणि वेळेवर विविध नवीन उपक्रम राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या कामांचा आढावा घेऊन महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने सूचना केल्या आणि महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या. या भेटी दरम्यान मा. कुलगुरू डॉ. गडाख यांनी महाविद्यालयाचे प्रक्षेत्र, जिमखाना, ग्रंथालय तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वस्तीगृहांना भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. गणेश देशमुख, डॉ. बी. डी. रोमाडे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची कृषि महाविद्यालय, हाळगावला भेट

**दि. २८ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी कृषि महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे शिक्षण, संशोधन आणि विस्तार या तीन तत्वांवर आधारीत आहे. कृषि पदवीधारकांनी फक्त नोकरीचा ध्यास न धरता शिक्षण घेत असतानाच आपण उद्योजक होण्यासाठी आणि आसपासच्या समाजातील घटकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे. या महाविद्यालयाने केवळ शिक्षण या तत्वावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य करावे. या भेटीदरम्यान, त्यांनी शेतकऱ्यांशी हितगुज साधून शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन तयार करण्यासाठी सहयोगी अधिष्ठाता यांना सुचित केले.

यावेळी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी विविध विभागांच्या प्रयोगशाळा विकसित करण्यासाठी मार्गदर्शन केले तसेच या महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर भेट देऊन पेरणी केलेल्या बिजोत्पादन क्षेत्राची पाहणी केली. या महाविद्यालयाने पडीत क्षेत्रावर आखणी केलेल्या फळबाग प्रक्षेत्रावर केशर आंब्याच्या रोपाचे वृक्षारोपण केले. सदर भेटीदरम्यान, विद्यार्थी वसतिगृहे, ग्रंथालय, जिमखाना येथे भेट देऊन सूचना केल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे हे विद्यापीठातील ३७ वर्षांच्या





प्रदीर्घ सेवेनंतर ३० जून, २०२५ रोजी सेवा निवृत्त होत आहेत त्यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या निमित्ताने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरुपात मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकातून डॉ. अनिल काळे यांनी महाविद्यालयातील विविध विकास उपक्रमांचा इतिवृत्तांत मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांना सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी तर आभार डॉ. दत्तात्रय सोनावने यांनी मानले.

## श्री. ताराचंद गागरे व श्री. सतीश चौधरी हे आहेत मे व जून महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १८ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली मफुकृवि आयडॉल्स या उपक्रमामध्ये मे व जून महिन्यातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकरी आयडॉल म्हणुन श्री. ताराचंद गागरे व कृषि उद्योजक आयडॉल म्हणुन श्री. सतीश चौधरी यांची निवड झालेली आहे. श्री. ताराचंद गागरे हे मु.पो. तांभेरे, ता. राहुरी, जी.अहिल्यानगर येथील शेतकरी असून कृषि पदवीधर आयडॉल श्री. सतीश चौधरी हे मु.पो. नादुर्खी बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील कृषि उद्योजक आहेत.

शेतकरी आयडॉल श्री. ताराचंद गागरे हे प्रगतशील शेतकरी असुन त्यांनी शाश्वत उत्पादन व उत्पन्न वाढीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसीत एकात्मिक शेती पध्दती तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार केला आहे. त्यांनी सन २००७ ते २०१२ या कालावधीत बियाणे विभाग, मफुकृवि, राहुरी यांचे मार्गदर्शनाखाली रब्बी हंगामात हरभरा पिकाच्या दिग्विजय या वाणाचा यशस्वी ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम राबवून ६०० क्वि. बियाणे निर्मिती करुन त्यापासून रु. १५ लाखाचे उत्पन्न मिळविले. विद्यापीठ विकसीत सोयाबीनच्या फुले संगम या वाणाचे १६ क्वि.प्रति एकर उच्चांकी उत्पादन घेतले आहे. श्री. गागरे यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यामध्ये सह्याद्री कृषि सन्मान

पुरस्काराचा समावेश आहे. तसेच कृषि महाविद्यालय, पुणे येथून कृषिचे शिक्षण घेतलेले कृषि पदवीधर आयडॉल कृषि उद्योजक श्री. सतीश चौधरी यांनी शिर्डी येथे साई लॅण्डस्केप ॲण्ड नर्सरी सन २००४ मध्ये सुरु केली. या उद्योगाच्या माध्यमातून त्यांनी विदेशी तसेच उष्णकटीबंधीय झाडांची बाग विकसीत करणे, सरफेस व सबसरफेस सिंचन व्यवस्थापन, क्लस्टर विकास तसेच वनीकरणांचा विकास इ. कामे केली आहेत. शहरातील बागांचा कल्पकतेनुसार लागवडीचा आराखडा तयार केला आहे. विविध प्रकारच्या मोठ्या झाडांचे यशस्वीरित्या प्रत्यारोपन करण्याचे कौशल्य व तंत्र त्यांनी अवगत केले आहे. विविध प्रकारच्या लॉन, लहान व मोठ्या आकाराची शोभिवंत झाडे तसेच फुलांचे गालीचे तयार करणे या कामात ते पारंगत आहे. माझी वसुंधरा या प्रकल्पांतर्गत परिसरातील विविध गावातील वनीकरणाचा आराखडा तयार करुन लागवड करण्यासाठी त्यांनी मदत केली आहे. शहरातील विविध मंदिरे तसेच त्यांच्या परिसराचे ना नफा तत्वावर सुशोभिकरणासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. त्यांच्या उद्योगामार्फत १५ पेक्षा जास्त व्यक्तींना वर्षभर रोजगार उपलब्ध झाला आहे. श्री. चौधरी यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. श्री घागरे व श्री चौधरी यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच इतर मफुकृवी, आयडॉल्स सर्वांना माहीत होण्यासाठी व त्यापासून विद्यार्थी शेतकरी नवीन उद्योजक यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रदर्शीत करण्यात येतात.

## कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची राहुरी ते पंढरपूर सायकलवरून कृषि तंत्रज्ञान प्रबोधनवारी



**दि. २१ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञ तसेच कर्मचारी यांच्या कृषि तंत्रज्ञान प्रबोधनवारी असा आशय असलेली राहुरी ते पंढरपूर या सायकलवारीचे प्रस्थान झाले. या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे यांनी या शास्त्रज्ञांच्या कृषि तंत्रज्ञान प्रबोधनवारीला शुभेच्छा दिल्या. या सायकलवारीत कृषि शक्ती व यंत्रे विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, विद्यापीठाचे एनसीसी अधिकारी लेफ्टनंट डॉ. सुनील फुलसावंगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र निमसे, पदुत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, श्री. दत्ता कदम, श्री. प्रणव पावसे, श्री. रवींद्र हरिचंद्रे व श्रीश नलावडे यांचा या वारीमध्ये समावेश आहे.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की कृषि पंढरी ते श्री विठ्ठल पंढरी कृषि तंत्रज्ञान प्रबोधन वारी हा प्रबोधन पर उपक्रम विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सुरू केला आहे. कृषि तंत्रज्ञान विस्ताराचा हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमामुळे कृषि तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार होत आहे. या कृषि तंत्रज्ञान प्रबोधन वारीदरम्यान शास्त्रज्ञांनी कृषि महाविद्यालय, मिरजगाव येथे विद्यार्थ्यांना आणि माहिजळगाव व करमाळा येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कृषि तंत्रज्ञान प्रबोधनवारीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी सायकलवारीत सहभागी शास्त्रज्ञांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. या कृषि तंत्रज्ञान प्रबोधनवारी दरम्यान त्यांनी शेतीविषयक तंत्रज्ञानाचा प्रसार केला आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात दिला व सन्माननीय पंतप्रधान यांचे फिट इंडिया मूव्हमेंटचा प्रचार केला.

वर्ष :५, अंक क्रं. : ५४, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिन संपन्न



**दि. ६ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील मृदशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके होते. याप्रसंगी मृदशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले, अखिल भारतीय समन्वित पाणी व्यवस्थापन योजनेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. राजेंद्र गेठे, डॉ. नरेंद्र काशीद व डॉ. सूर्यभान ईल्हे उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रशांत बोडके आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की पर्यावरण जपणे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे. येणाऱ्या नव्या पिढीसमोर पर्यावरण जपण्याचे खूप आव्हान आहे. आपण सर्वजण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्लास्टिकचा वापर करतो. हेच प्लास्टिक पर्यावरणातील हवा, पाणी व जमीन प्रदूषित होण्यास कारणीभूत ठरते. प्लास्टिकला पर्याय शोधण्यासाठी विद्यार्थ्यांची संशोधक वृत्ती उपयोगी ठरणार आहे. शासनस्तरावर उद्योजकांसाठी खूप साऱ्या योजना आहेत. तरुण उद्योजक विद्यार्थ्यांनी आपली नैतिक जबाबदारी ओळखून या संधीद्वारे आपल्या नाविन्यपूर्ण संशोधनाने या समस्येवर मात करावी. संशोधक विद्यार्थी जैविक पद्धतीने विघटनशील प्लास्टिक बनवून पर्यावरण रक्षणासाठी मोठा हातभार लावू शकतात. त्यासाठी नावीन्यपूर्ण संशोधनाची गरज आहे असे यावेळी ते म्हणाले.

यावेळी डॉ. अनिल दुरगुडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की वसुंधरेवर सर्व प्राणीमात्र तसेच प्रजातींना जगण्याचा अधिकार असून नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही मानवाची आहे. प्लास्टिकच्या अतिरिक्त वापरामुळे मनुष्य, जनावरे, पक्षी, जलचर प्राणी यांना धोका निर्माण झाला आहे. यासाठी आपण सर्वांनी प्लास्टिकचा वापर कमी करून कापड, कागद, धातू इत्यादी पर्यायी सामग्रीचा वापर करावा. त्याचबरोबर प्रत्येकाने एक झाड आईच्या नावाने या मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण करावे. विविध समारंभात भेटवस्तू म्हणून फुले, फळझाडांचे रोपे वाटावीत. पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे व याची सुरुवात स्वतःपासून करावी असे आवाहन डॉ. भीमराव कांबळे यांनी यावेळी केले. डॉ. सूर्यभान इल्हे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. क्रांती पाटील यांनी हवामान बदलाचा शेतीवरील परिणाम या विषयावरील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्र गेठे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मृदशास्त्र व कृषिविद्या विभागातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडझरी खु. येथे कृषि साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

**दि. १० जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या नेतृत्वाखाली व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल कदम यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व कृषि अभियांत्रिकी विभाग महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली हा प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कृषि साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन वडझरी खु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल कदम, वडझरी खु., गावचे उपसरपंच श्री. पांडुरंग सुपेकर, स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. प्रमोद पोपळे उपस्थित होते.





यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय असून ग्रामीण जनता शेतीवर अवलंबून आहे. बदलत्या हवामानाला सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये अवलंब करून शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करणे हा शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम आहे. याप्रसंगी डॉ. सुनिल कदम यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन कृषि साहित्य वाटपाचा महत्त्वाचा उद्देश शेतकऱ्यांना समजावून सांगितला. याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून वडझरी खु. गावातील ३२ शेतकर्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी–२०२५ या साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राजेंद्र सुपेकर तर आभार श्री. अशोक भडांगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी वडझरी खु. गावातील लाभार्थी शेतकरी तसेच स्मार्ट इरिगेशन प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, वरिष्ठ संशोधन सहकारी इंजि. शुभम सुपेकर आणि इंजि. गणेश खेमनर उपस्थित होते.

## अळिंबी संशोधन प्रकल्पाची वार्षिक बैठक संपन्न






**दि. १३ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय समन्वित अळिंबी संशोधन प्रकल्पांतर्गत २७ व्या वार्षिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. सुधाकर पांडे उपस्थित होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पुष्प विज्ञान अनुसंधान प्रकल्पाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील अळिंबी संशोधन प्रकल्पाचे संचालक तथा प्रकल्प समन्वयक डॉ. वेदप्रकाश शर्मा, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने व अळिंबी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र खडतरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुधाकर पांडे म्हणाले की अन्नधान्य उत्पादनात भारताचे वर्चस्व आहे. यामध्ये पौष्टिक अन्न सुरक्षा ही महत्त्वाची आहे. त्या

दृष्टीने अळिंबीचे पौष्टिक मूल्य, औषधी गुणधर्म तसेच अळिंबी उत्पादनास लागणारे कमी पाणी, अल्प खर्चिक प्रक्रिया व मूल्यवर्धन तंत्रज्ञानाचा विचार करता अळिंबी उत्पादनास प्रोत्साहन दिले पाहिजे. यासाठी अळिंबीचा आपल्या आहारामध्ये सुपरफुड म्हणून समावेश होणे गरजेचे आहे. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की अळिंबी उत्पादनास लागणारी मर्यादित संसाधने व कमी गुंतवणूक यामुळे ग्रामीण तसेच अर्ध शहरी भागातील शेतकऱ्यांसाठी अळिंबी उत्पादन रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढीसाठी उत्तम संधी आहे. अळिंबी उत्पादन तंत्रज्ञानाची सेंद्रिय शाश्वत शेती सोबत सांगड घालून प्रभावी व पर्यावरण पूरक नियंत्रण उपाययोजनांसाठी अधिकचे संशोधन होणे गरजेचे आहे. यावेळी डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी आपल्या मार्गदर्शनात अळिंबीचे आपल्या आहारात प्रमाण वाढवणे गरजेचे असल्याचे नमूद केले. डॉ. वेदप्रकाश शर्मा यांनी भारतामध्ये कार्यरत विविध अळिंबी संशोधन प्रकल्पांच्या कार्याचा आढावा घेऊन प्रगती अहवाल सादर केला. यावेळी अळिंबी संशोधन उत्पादन तंत्रज्ञान व प्रशिक्षण या विषयावरील विविध प्रकाशनांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. राजेंद्र खडतरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विविध अळिंबी संशोधन प्रकल्पांचे शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत कृषि साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न





**दि. १३ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल कदम यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व कृषि अभियांत्रिकी विभाग महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कृषि साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन नाळीद, ता. कळवण, जि. नाशिक येथे करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा स्मार्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम होते. याप्रसंगी संशोधन उपसंचालक तथा मृद व जलसंधारण विभागचे सहयोगी प्राध्यापक डॉ. भाऊ गावित, नाळीद गावचे उपसरपंच श्री. काळू बागुल, संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, वरिष्ठ संशोधन सहकारी इंजि. शुभम सुपेकर उपस्थित होते.

या प्रसंगी डॉ. सुनील कदम म्हणाले की शेतकरी समुदायाला शेतीसाठी आवश्यक असणारी छोटी यंत्रे व अवजारे त्यामुळे त्यांचे कष्ट कमी होऊन, उत्पादकता वाढून शेती करण्याच्या शाश्वत पध्दतींना प्रोत्साहन मिळते. यावेळी डॉ. भाऊ गावित यांनी विद्यापीठाच्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून नाळीद गावातील ५० शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी– २०२५ या साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे तर आभार श्री. नंदन गावित यांनी मानले. या कार्यक्रमासाठी नाळीद गावातील लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्ष :५, अंक क्रं. : ५४, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## विकसीत कृषि संकल्प अभियानाचा सांगता समारंभ संपन्न




**दि. १४ जून, २०२५.** कृषि व किसान मंत्रालय भारत सरकार द्वारा, देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी तसेच देशाचे केंद्रीय कृषिमंत्री मा. श्री. शिवराजसिंह चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान "विकसित कृषि संकल्प अभियान" अहिल्यानगर जिल्ह्यात राबविण्यात आले. या अभियानाचा अहिल्यानगर जिल्ह्यातील सांगता समारंभ कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे येथे संपन्न झाला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणेच्या कार्यक्षेत्रातील नेवासा, शेवगाव, पाथर्डी, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड व अहिल्यानगर तालुक्यातील ९० गावांमध्ये जाऊन कृषि शास्त्रज्ञ व कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रात घेण्यात येणाऱ्या विविध पिकांचे आधुनिक पीक उत्पादन तंत्रज्ञान तसेच शासकीय योजना यांच्याबद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली.

कृषि विद्यापीठाने विकसित केलेले आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी वापरावे. विद्यापीठाने नवीनच विकसित केलेले फुले सुपर बायोमिक्स हे पाच उपयुक्त बुरशी आणि सहा उपयुक्त जिवाणू यांचे पावडर आणि द्रवरूप स्वरूपातील मिश्रण विद्यापीठाने विकसित केले असून शेतकऱ्यांनी त्याचा उपयोग आपल्या शेतीमध्ये करावा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. यावेळी व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र डॉ. आनंद चवई, डॉ. ए. व्ही. आतार, डॉ. बरय्या, डॉ. बसवराज पाटील, डॉ. एस. एस. कौशिक, श्री. अंकुश जोगदंड, तालुका कृषि अधिकारी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. माणिक लाखे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नारायण निबे यांनी तर आभार श्री. प्रकाश बहिरट यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री. नंदू पाटील, श्री. महेश म्हस्के, उप शेतकी अधिकारी श्री. आव्हाड, श्री. म्हस्के तसेच परिसरातील पुरुष आणि महिला प्रगतशील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा



**दि. २१ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय आणि सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक महाविद्यालय यांच्या संयुक्त

विद्यमाने विद्यापीठातील सावित्रीबाई फुले माध्यमीक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भनगे, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले, सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. अरुण तुपविहीरे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब खेत्री व इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगीता आठरे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी योग व प्राणायाम गरजेचा आहे. आपल्या सर्वांच्या जीवनात योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात योग व प्राणायामाचा अंगीकार केल्यास त्यांचे शारिरीक व मानसीक आरोग्य उत्तम राहुन त्यांची एकाग्रता वाढते त्यामुळे अभ्यासामध्ये प्रगती होते. यावेळी योगशिक्षक डॉ. बी.डी. पाटील व श्री. रविंद्र आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सुंदरम घुले, विद्यार्थिनी कु. स्नेहा तांबे, कु. प्रज्ञा आंधळे व कु. शिवानी शिंदे यांनी उत्तम प्रकारे योग व प्राणायाम प्रात्यक्षिके करुन दाखविली. डॉ. सुनील भनगे यांनी स्वागत तर क्रीडाशिक्षक श्री. घनश्याम सानप यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक श्री. बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक श्री. मनोज बावा, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच सावित्रीबाई फुले प्राथमिक, माध्यमिक विद्यालय व इंग्रजी माध्यमाच्या सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक, माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात डाळमिल प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. २४ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे चेन्नई येथील नॅशनल ॲग्रो फाउंडेशन आणि कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय डाळमिल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभागात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, चन्नई येथील नॅशनल ॲग्रो फाउंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. चंद्रकांत देवरे, सहयोगी प्राध्यापक डॉ. विलास साळवे आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. गणेश शेळके उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांनी केवळ उत्पादन करण्यावर लक्ष केंद्रित न करता आपल्या उत्पादनावर प्रक्रिया करून त्याला अधिक मूल्य कसे मिळेल याचा विचार करणे आवश्यक आहे. डाळ मिल प्रक्रिया उद्योग हा त्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. मुल्यवर्धनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊ शकते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कंबळेश्वर शेतकरी उत्पादक कंपनी, आष्टी आणि यशवंत शेतकरी उत्पादक कंपनी, अंबाजोगाई या दोन प्रमुख शेतकरी उत्पादक कंपन्याच्या संचालकांना आणि प्रतिनिधी शेतकऱ्यांना डाळ प्रक्रिया तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान देणे हा आहे. यावेळी डॉ. सचिन नलावडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या सरकारच्या धोरणात शेतकरी उत्पादक कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावतात. हे प्रशिक्षण या कंपन्यांच्या सदस्यांना डाळ प्रक्रिया तंत्रज्ञान आणि व्यवसाय व्यवस्थापनाची माहिती देऊन त्यांना अधिक सक्षम बनवेल.

ज्यामुळे ते सामूहिकपणे कार्य करून अधिक नफा कमवू शकतील. डॉ. कैलास कांबळे स्वागत करतांना म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये सहभागींना डाळ मिल यंत्रांची कार्यपद्धती, डाळींची गुणवत्ता तपासणी, प्रक्रिया करताना घ्यायची काळजी आणि तयार मालाच्या विक्रीचे नियोजन याबाबत सखोल माहिती दिली जाईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास साळवे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. विक्रम कड यांनी मानले. यावेळी नॅशनल ॲग्रो फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि प्रशिक्षणार्थी शेतकरी उपस्थित होते.

## बियाणे विभागामार्फत आदिवासी शेतकऱ्यांना टी.एस.पी. अंतर्गत बियाणे वाटप



**दि. ३० जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत बियाणे विभागाच्या वतीने मौजे इन्शी, ता. कळवण, जि. नाशिक येथे अनुसूचित जमाती (TSP) अनुदानातून आदिवासी शेतकरी बांधवांना खरीप हंगामातील विद्यापीठ संशोधीत सोयाबीन पिकाचे फुले किमया व दूर्वा या वाणाचे मोफत बियाणे वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे नेतृत्वाखाली संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी इन्शी गावचे सरपंच श्री. बाळासाहेब पवार, पोलीस पाटील श्री. तुळशीराम पवार, गोळाखोल गावचे सरपंच प्रभाकर गायकवाड, पोलीस पाटील श्री. रामदास पवार, कृषि सहाय्यक अमोल पाटोळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विपणन अधिकारी डॉ. दिलीप ठाकरे यांनी केले. उपस्थित शेतकऱ्यांना डॉ. अविनाश कर्जुले यांनी बीज प्रक्रिया, डॉ. के.सी. गागरे यांनी सोयाबीन वाणांची तसेच डॉ. नितीन दानवले यांनी आधुनिक सोयाबीन लागवड तंत्रज्ञानाची संपूर्ण माहिती दिली. यावेळी एकूण ४४३ लाभार्थी शेतकऱ्यांना प्रति एकर क्षेत्राचे २६ किलो प्रति बॅग प्रमाणे एकूण ११ क्विंटल ५१८ किलो सोयाबीन बियाणे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. नितीन दानवले यांचे नेतृत्वाखाली श्री. भूषण हंडाळ, श्री. संदीप कोकाटे व बियाणे विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी चांगले नियोजन केले. याप्रसंगी पुरुष व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात १२ अधिकारी व कर्मचारी झाले सेवानिवृत्त

**दि. ३० जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे जून महिन्यात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार व सेवानिवृत्त विषयक लाभ देण्यासाठी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. खरबडे होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व उपकुलसचिव श्री. विजय पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की सेवानिवृत्त होत असलेले अधिकारी तसेच कर्मचारी या सर्वांनी आपल्या कार्यालयीन कामात चांगले योगदान दिले. त्यांच्या कामातून त्यांनी इतरांसाठी प्रेरणा ठरेल असा आदर्श ठेवला आहे. विद्यापीठाने आजपर्यंत केलेल्या यशस्वी वाटचालीमध्ये विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. विठ्ठल शिर्के यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी श्री. विजय पाटील यांनी सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांचा जीवनपरिचय करुन दिला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राहुरी, धुळे, कोल्हापूर व पुणे या चार विभागातील १२ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे यांच्या हस्ते सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. बी. एम. कांबळे, डॉ. भरत पाटील, डॉ. एम. आर. पाटील, डॉ. प्रकाश लोखंडे व डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सत्काराला उत्तर देतांना





डॉ. अनिल काळे, डॉ. अनिल दुरगुडे व डॉ. डी.पी. कचरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. संजय रुपनर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, सहाय्यक कुलसचिव (प्रशासन) श्री. सागर पेंडभाजे, श्रीमती प्रमिला मगर, श्रीमती शैला पटेकर व श्री. मयूर भोकरे यांनी अथक परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव सेथे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांची भेट





**दि. ६ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक यांनी भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठात डॉ. अनिल काळे यांनी स्वागत केले. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कागदी लिंबू फळपिकाचे साई शरबती व फुले शरबती हे दोन वाण विकसित केलेले असून त्यांची रोपे बहुसंख्य शेतकरी बांधवांना अल्पदरात विक्री करत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव यांनी फुले शरबती या लिंबू वाणाचे ५००० रोपे प्रतिकूल परिस्थितीत तयार करून शेतकरी बांधवांना उपलब्ध केली आहेत. सदर लिंबू वाण शेतकरी बंधूंना निश्चित वरदान ठरेल.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी सातव्या सत्रातील अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लिंबू फळपिकाची रोपे आणि गांडूळखत प्रकल्पाची पाहणी केली. त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्रयोगशाळांना भेटी दिल्या. तसेच महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर चालू वर्षी मूग, उडीद या पिकांचे बीजोत्पादन व फळपिकांची लागवड होणार असल्याचे प्रतिपादन डॉ. अनिल काळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी तर आभार डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी मानले.

## जळगाव येथील पानवेल संशोधन प्रकल्पात शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन

**दि. २५ जून, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत कार्यरत जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राअंतर्गत पानवेल संशोधन प्रकल्पात पानवेल शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन करण्यात आला. कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, जळगाव तेलबिया संशोधन केंद्रातील प्रमुख डॉ. दीपक दहात यांच्या मार्गदर्शन, संकल्पनेतून हा मंच स्थापन करण्यात आला आहे. जळगाव तालुक्यातील शिरसोली,



जामनेरातील शेंदणी आणि भुसावळातील कुऱ्हे पानाचे येथील शेतकऱ्यांचा या मंचामध्ये समावेश आहे. पानवेल संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पोपट खंडागळे यांनी याबाबत कुऱ्हे पानाचे येथील कार्यक्रमात पानवेल पिकाबाबत मार्गदर्शन केले. त्यात वाणांची निवड, जमीन, वातावरण, पानवेलींच्या आधाराची झाडे (शेवरी, पांगारा, शेवगा) याबाबत डॉ. खंडागळे यांनी माहिती दिली. पानवेल उत्पादक शेतकरी श्री. प्रमोद उंबरकर, श्री. रमेश बारी, श्री. संतोष वराडे, श्री. नितीन वराडे, श्री. विनोद बोबडे, श्री. भूषण बारी, श्री. प्रवीण नागपुरे, श्री. महेंद्र रंदाळे, श्री. विलास रंदाळे, श्री. भूषण उंबरकर, श्री. लतेश बारी आदी उपस्थित होते. आत्माचे श्री. प्रमोद जाधव यांनी माती परीक्षण, त्याचे लाभ, जमीन सुपीकता याबाबत माहिती दिली. कृषि विभागातील सहायक कृषि अधिकारी श्री. संकेत खैरनार यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमात पानवेल मर रोग व्यवस्थापनाबाबतच्या किटचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले. आत्माअंतर्गत शेतीशाळेसाठी हे किट देण्यात आले.

## कृषि महाविद्यालयांचे उपक्रम

### धुळे कृषि महाविद्यालयात नेत्रदानाविषयी व्याख्यानाचे आयोजन



**दि. २३ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नेत्रदान जनजागृती मोहिमेअंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव ईल्हे, पशुशास्त्र व दुग्धशास्त्र विभागाचे डॉ. राहुल देसले व वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रा. जितेंद्र सुर्यवंशी उपस्थित होते. यावेळी आपल्या मार्गदर्शनात डॉ. केतकी शहा म्हणाल्या की नेत्रदानानंतर पुढच्या जन्मात आंधळेपणा येतो किंवा स्वर्गदर्शन होत नाही, अशा अंधश्रध्दा समाजात पसरलेल्या आहेत त्या दूर करणे आजच्या तरुण पिढीचे कर्तव्य आहे. नेत्रदानासा संकल्प करा, मृत्युनंतर मृत्युंजय बना असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. बबनराव इल्हे यांनी नेत्रदानाच्या सामाजिक भाष्य करत प्रत्येक दाता एक दृष्टिदाता ठरु शकतो असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल देसले यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रा. जितेंद्र सुर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाचा शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थ्यी व प्राध्यापकांकडून नेत्रदानाचे प्रतिज्ञापत्र भरुन घेण्यात आले. यावेळी कृषि महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यी मोठया संख्येने उपस्थित होते.

वर्ष :६, अंक क्रं. : ५६, जून २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा





**दि. ५ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरचे डॉ. बाळासाहेब रोमाडे, श्री. नामदेव धुर्वे डॉ. सागर बंड, डॉ. कुशल ढाके आणि डॉ. सागर पाटील यांची उपस्थिती होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. बाळासाहेब रोमाडे म्हणाले की जागतिक पर्यावरण दिनाची सुरुवात १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने (UNGA) केली. जागतिक पर्यावरण दिनासाठी दरवर्षी वेगवेगळी थीम निवडली जाते आणि त्या अनुषंगाने या वर्षी जागतिक पर्यावरण दिनाची थीम प्लास्टिक प्रदूषणावर मात (Beat Plastic Pollution) अशी ठेवण्यात आली आहे. जागतिक पर्यावरण दिन आजघडीला १५० हून अधिक देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवशी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, आणि पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन असे उपक्रम हाती घेतले जातात. २०२५ च्या थीम अंतर्गत, प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी नॅनोटेक्नॉलॉजी, बायोडिग्रेडेबल प्लास्टिक, आणि प्लॅस्टीकला नैसर्गिक पर्याय कोणते यावर संशोधनाला प्रोत्साहन दिले जात आहे. दरवर्षी सुमारे ८ दशलक्ष मेट्रिक टन प्लास्टिक समुद्रात जाते असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कुशल ढाके यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थिनींनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. जागतिक पर्यावरण दिन या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रश्नमंजुषा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार प्रदर्शन श्री. नामदेव धुर्वे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा





**दि. २१ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सागर बंड, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर पाटील, श्री. अशोक

पाटील, श्री, सिद्धार्थ काळे आणि श्री. श्रीकांत अरगडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (राष्ट्रीय सेवा योजना) डॉ. कुशल ढाके म्हणाले की आंतरराष्ट्रीय योग दिन २०१५ पासून दरवर्षी २१ जून रोजी जगभर साजरा केला जातो. यावर्षी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जात असून योगाचे महत्त्व लोकांना कळावे आणि लोकांनी निरोगी जीवनशैली स्वीकारावी यासाठी हा दिवस समर्पित आहे. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनीं आणि सर्व उपस्थित प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी योगासने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सागर बंड यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सागर पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील विद्यार्थ्यांची दक्षिण भारत शैक्षणिक सहल संपन्न






**दि. २३ जून २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या द्वितीय वर्षातील चौथ्या सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १४ ते २१ जुन, २०२५ या कालावधीत दक्षिण भारत दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलीसाठी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. पाचव्या अधिष्ठाता समितीनुसार कृषि शिक्षणामध्ये अंतर्भूत असलेल्या EDTN-242 (Educational Tour) या विषयांतर्गत विद्यार्थ्यांना कृषि शिक्षण व संशोधन यासबंधी माहिती मिळावी या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी दक्षिण भारत दर्शन शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीअंतर्गत दक्षिण भारतातील तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथील राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, राष्ट्रीय कृषि अनुसंधान प्रबंधन अकादमी, विस्तार शिक्षण संस्था हैद्राबाद इ. ठिकाणी भेटी दिल्या. कर्नाटक राज्यातील मैसूर येथील केंद्रीय अन्न तंत्रज्ञान ओद्योगिक संशोधन संस्था, केंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, उद्यानविद्या महाविद्यालय, मैसूर येथे भेटी देऊन विद्यार्थ्यांनी तज्ञांकडून मार्गदर्शन व सखोल माहिती घेतली. बंगलोर येथील कृषि विज्ञान विद्यापीठ येथे मधुमक्षिका पालन या उपक्रमाचे विविध प्रयोग व उत्पादने यांची माहिती घेतली. भारतीय बीज संशोधन व तंत्रज्ञान संस्था, वनस्पतिशास्त्रीय उद्यान येथे भेट देऊन विविध आयुर्वेदिक वनस्पती यांची ओळख व उपयोग तेथील शास्त्रज्ञांकडून समजून घेतले. या सहलीचे यशस्वी नियोजन महाविद्यालयातील डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, प्रा. नामदेव धुर्वे आणि डॉ. मनीषा पालवे यांनी केले

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे नेत्रदान जनजागृती मोहिम

**दि. २३ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नेत्रदान जनजागृती मोहिमे अंतर्गत विद्यार्थी–विद्यार्थिनी, प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यामध्ये नेत्रदानाच्या उदात्त कार्याबद्दल तसेच डोळ्यांच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक काळजी घेण्यास प्रोत्साहन देणे यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून शासकीय सामान्य रुग्णालय, मुक्ताईनगर येथील नेत्ररोगतज्ञ डॉ. पंडीत खेवलकर यांनी नेत्र आरोग्याचे महत्व, डोळ्यांची निगा, संगणक आणि मोबाइलच्या अतिवापराने डोळ्यांवर होणारे परीणाम याबद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी नेत्रदानासंबंधी मृत व्यक्तीच्या डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, नेत्रदान कोणी करावे व कोणी करू नये, अर्ज कुठे करावा व त्यासंबंधी उपस्थितांना नेत्रदान जनजागृती अभियान आंतर्गत





प्रेरणादायी माहिती दिली. कार्यक्रमाला कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. रमेश चौधरी, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. नामदेव धुर्वे यांनी केले. सूत्रसंचालन कु. मानसी देसाई हिने तर आभार प्रदर्शन कु. स्नेहल माने हिने केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन





**दि. ६ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव, अखिल भारतीय समन्वयित एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प, म.फु.कृ.वि., राहुरी, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, भारतीय शेती प्रणाली संस्था, मोदीपूरम, कृषि व आत्मा विभाग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पीक विविधीकरण पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आणि शेतकरी मेळाव्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव यथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे होते. यावेळी पीक विविधीकरण पथदर्शी प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ. उल्हास सुर्वे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. नंदकुमार कुटे, कर्जत–जामखेडचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. राजेंद्र सुपेकर, तालुका कृषि अधिकारी श्री. रविंद्र घुले, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री. सोमनाथ पाचारणे, हाळगावचे माजी सरपंच श्री. किसनराव ढवळे, माजी उपसरपंच श्री. आबासाहेब ढवळे, फक्राबादचे सरपंच श्री. विश्वनाथ राऊत, निवृत्त कृषि अधिकारी श्री. सुभाष ढवळे, प्रगतशील शेतकरी श्री. मिलिंद देवकर, श्री. शरद ढवळे, डॉ. दत्तात्रय सोनवणे व वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळूंजकर उपस्थित होते.

यាप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. अनिल काळे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी भरीव योगदान दिलेले आहे. या विद्यापीठाने आजतागायत विविध पिकांचे ३१४ सुधारित वाण/जाती, ५४ कृषियंत्रे व औजारे आणि १९२७ कृषि तंत्रज्ञान शिफारशी शेतकरी बांधवांसाठी दिल्या आहेत. हे महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी कमी मनुष्यबळात शिक्षणाचे चांगल्या प्रकारचे कार्य करत आहे. आधुनिक

कृषि तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार शेतकऱ्यांपर्यंत करण्यासाठी महाविद्यालय कटिबंध आहे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक करतांना डॉ. उल्हास सुर्वे म्हणाले की शेतकरी बांधवांनी एका पिकावर अवलंबून न राहता बहू पीक पद्धतीचा अवलंब करावा. शेततळे शेतकऱ्यांना वरदान असून पाण्याचा थेंब न थेंब उपयोगात आणून आपल्या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, त्याबरोबर जमिनीचा पोत सुधारणे, जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्यास मदत करणे जेणेकरून मनुष्य जीवनावर त्याचे विपरीत परिणाम होणार नाही हा या प्रकल्पाचा महत्वाचा उद्देश आहे. तांत्रिक सत्रांमध्ये श्री. राजेंद्र सुपेकर यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांची शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. डॉ. अनिल दुरगुडे यांनी जमीन आरोग्य व्यवस्थापन, डॉ. भरत पाटील यांनी कांदा लागवड तंत्रज्ञान या विषयावर, डॉ. नंदकुमार कुटे यांनी खरीप हंगामात कडधान्य पिकांचे लागवड तंत्रज्ञान तर प्रा. पोपट पवार यांनी कागदी लिंबू लागवड तंत्रज्ञान व लिंबू वर्गीय पिकांचे मूल्यवर्धन या विषयांवर शेतकर्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निकिता धाडगे यांनी तर आभार डॉ. इकबाल बागवान यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एकूण १५० शेतकरी, कृषि अधिकारी, कृषि महाविद्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## हाळगाव येथिल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात योग दिन साजरा



**दि. २१ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे आंतरराष्ट्रीय योगदिवसानिम्मित राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी योग प्रशिक्षिका श्रीमती अर्चना महाजन, डॉ. निकिता धाडगे, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. महेश निकम, डॉ. धनंजय पाटील, महादू शिंदे, प्रदीप धारेकर, सुरेश माकरे, शशिकांत कांबळे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. दत्तात्रय सोनवणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की संयुक्त राष्ट्रांनी मानवजातीच्या सुदृढ आरोग्यासाठी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. संपूर्ण जगाला योगाने निरोगी बनवण्याची कल्पना यावर्षी 'एक स्वास्थ्य, एक पृथ्वीसाठी योग' या संकल्पनेतून मांडण्यात आली आहे. निरोगी आरोग्य व मानसिक शांतीसाठी, विद्यार्थ्यांनी योगासने एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता त्यांना आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनवावे. योग प्रशिक्षिका अर्चना महाजन यांनी विद्यार्थ्यांना योगासनांचे प्राचीन काळापासून असणारे महत्व, त्यांचा इतिहास व विविध प्रकार यांची माहिती दिली. प्रात्यक्षिकाद्वारे प्राणायमाचे विविध प्रकार व योगासने विद्यार्थ्यांसमोर सादर केली. सदर कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नेत्रदान शिबीर संपन्न

**दि. २३ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय पंतप्रधान महोदय यांच्या दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नेत्रदान करणाऱ्यांकडून ७५०० संमती अर्ज संकलित करण्याचा निर्णय महामहिम राज्यपाल कार्यालयाकडून घेण्यात आलेला आहे. या धर्तीवर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नेत्रदान शिबीराजचे अयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. गोकुळ वामन होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. गोकुळ वामन म्हणाले की मानवी देह नाशवंत आहे. मानवाच्या प्रत्येक अवयवांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक मानव





रक्तदान, नेत्रदान, शरीरदान ईत्यादी दान करत असतो. परंतु नेत्रदान हे एक सर्वश्रेष्ठ दान आहे. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठय़ा संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. संदीप मोरे यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी



**दि. २६ जून, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्राध्यापक कृषि विद्या डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या महान कार्यास उजाळा दिला. समाज हितासाठी शाहू महाराजांनी केलेली विविध कार्ये मुख्यत्वे बहुजन समाजात शिक्षणप्रसार, स्त्री शिक्षणाचा प्रसार, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे यांची ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## अकलाड गावात कृषिदूतांकडून शेतकरी प्रबोधन

**दि. ११ जून, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथील विद्यार्थ्यांचे ग्रामीण कृषि जागरूकता आणि कृषि औद्योगिक उपक्रमाचे आयोजन धुळे तालुक्यातील अकलाड येथे करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञान, माती–पाणी परीक्षण, कोड व रोग व्यवस्थापन या विषयीची माहिती दिली. यावेळी पवन लिमकर, अनिकेत घांडगे, स्वराज मोहकरे, किरण जाधव, योगेश जाधव, हर्षद जगताप, अथर्व लोखंडे यांचा समावेश आहे. या उपक्रमात विद्यार्थी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. सरपंच अजय सूर्यवंशी व ग्रामस्थ उपस्थित होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम इल्हे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जयप्रकाश गायकवाड, कार्यक्रमाचे प्रमुख आर.जे. देसले, कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रसाद मरगळ यांचे मार्गदर्शन लाभले.

## जुलै महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- आडसाली ऊस लागवडीसाठी जमिनीची पूर्व मशागत करुन रानबांधणी व आखणी पूर्ण करावी.
- मध्यम जमिनीत एक मीटर अंतरावर तर भारी जमिनीत १.२० मीटर अंतरावर सरी उताराच्या आडवी सोडावी.
- सरी सोडण्यापूर्वी प्रति हेक्टरी ३० टन (६० बैलगाडया) चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट वापरा. ऊस लागणीच्या वेळी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) (१.९३ पोती), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) व ८५ किलो पालाश (१४५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.२२ पोती) प्रति हेक्टरी पेरुन द्यावा.
- को ८६०३२ या जातीची लागण करतेवेळी ५० किलो नत्र (११० किलो युरिया) (२.४४ पोती),१०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (१३.८९ पोती) व पालाश १०० किलो (१७० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.७८ पोती) प्रति हेक्टरी वापरावा.
- आडसाली लागण करताना को ८६०३२, फुले ०२६५, फुले ऊस १५०१२ आणि व्हीएसआय ०८००५ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांचा जमिनीच्या मगदूरानुसार वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी १० ग्रॅ कार्बेन्डझीम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १० मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १ किलो ॲसेटोबॅक्टर आणि १२५ ग्रॅम प्रति १० लिटर स्फुरद विरघळविणारे जिवाणू मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी किडीच्या नियंत्रणासाठी क्लोथीआनिडीन ५०% डब्ल्यू. डी.जी. हेक्टरी २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे व मुळ पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी फिप्रोनिल ०.३% दाणेदार प्रति हेक्टरी २५ किलो सरीमध्ये चळीतून द्यावे.
- ऊस लागणीकरीता ऊसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.
- उसावरील पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर फिप्रानिल ३० ग्रॅम मॅन्कोझेब प्रति १० लिटर किंवा कार्बेन्डॅझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसाच्या अंतराने कराव्यात.
- हुमणी किडीचा बंदोबस्त करण्यासाठी, हुणीग्रस्त ऊस पिकांची रोपे उपटावीत. जमिनीत मुळाशेजारी मिळालेल्या अळया गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. रासायनिक नियंत्रणासाठी फिप्रोनिल ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०% दाणेदार हेक्री ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे अथवा थायमिथोक्झाम ०.९०% + फिप्रोनिल ०.२०% जी.आर. हेक्टरी १५ किलो सरीमध्ये चळीतून द्यावे.
- ऊसावरील तांबेरा व तपकिरी ठिपके रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% (१० मिली प्रति १० लिटर पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या रोगाच्या प्राथमिक लक्षणे दिसून आल्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

### बागायती कापूस

- पीक तणविरहीत ठेवण्यासाठी कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास बुप्रोफेझीन २५ एस. सी. या किटकनाशकाची २० मिली किंवा फ्लोनिकॅमीड ५० डब्ल्यु.जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- फुलकिडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून आल्यास फिप्रोनील ५ एस.सी. ३० मिली किंवा डायफेन्युरॉन ५० डब्ल्यु.पी. १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- आकस्मिक रोग दिसून आल्यास १.५ किलो युरीया व १.५ किलो पालाश, १०० लिटर पाण्यात मिसळून प्रति झाडास १५० ते २०० मिली द्रावण झाडाच्या बुंध्यापाशी ओतावे.
- अति पावसामुळे (नैसर्गिकरित्या) पानेगळ होण्याची शक्यता असते, अशा वेळेस नॅप्थॅलिन ॲसेटिक ॲसीड (फ्लॅनोफिक्स) १०० मिली

प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

- बीटी कापूस लागवडीनंतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.
- बिगर बीटी कपाशीसाठी लागवडीनतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.

### भात

### पुर्नलागवड

- रोपांच्या पुर्नलागवडीसाठी पारंपारीक पद्धतीने अथवा यंत्राच्या साह्याने चिखलणी करावी. हळव्या जातीची लागण पेरणीनंतर २१ते २५ दिवसांनी, निमगरव्या जातीची २३ते२७ दिवसांनी व गरव्या जातींची २५ ते ३० दिवसांनी करावी. एका चुडात २ ते ३ रोपे ठेवावीत.
- संकरित जातींसाठी एका चुडात फक्त १ ते२ रोपेच ठेवावीत.
- हळव्या जातींच्या रोपांची लावणी १५ द १५ सें.मी. तर निमगरव्या व गरव्या जातींची २० द१५सें.मी. अंतरावर करावी.
- सेंद्रीय खतांचा वापर : चिखलणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन हिरवळीचे खत जमिनीत गाडावे. याकरीता धैंच्या अथवा ताग वापरावा. दुसरा मार्ग म्हणजे गिरीपुष्पाची शेताच्या बांधावर लागवड करावी. लागवडीनंतर दुसऱ्या वर्षापासून या झाडाचा पाला भात लावणीच्या ८ ते १० दिवस अगोदर शेतात गाडावा. गिरीपुष्पाची हिरवी पाने ३मे.टन प्रति हेक्टरी शेतात गाडल्यास नत्र खताकरता लागणाऱ्या खर्चात खूप बचत होते.
- रासायनिक खतांचा वापर : भात लागवडीसाठी हेक्टरी १०० किलोग्रॅम नत्र (४ बॅग ३७ कि. युरिया), ५० किलोग्रॅम स्फुरद (६ बॅग १३ कि. सिंगल सुपर फॉस्फेट) व ५० किलोग्रॅम पालाश (२ बॅग ३४ कि. म्युरेट ऑफ पोटॅश) या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. हि खत मात्रा हळव्या जातींमध्ये लागणीच्या वेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीच्यावेळी ४० टक्के नत्र आणि संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. संकरीत जातींकरीता हेक्टरी १२० किलोग्रॅम नत्र, ५० किलोग्रॅम स्फुरद व ५० किलोग्रॅम पालाश या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. ही खत मात्रा लागणीच्यावेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.
- जैविक खतांचा वापरः विविध जैविक खते जशी निळे हिरवे शैवाल प्रति हेक्टरी २०किलोग्रॅम भात लागणीनंतर ८ते१० दिवसांनी शेतात टाकावे., अॅझोला (४ते ५ क्विंटल प्रति हेक्टर) चिखलणीच्यावेळी शेतात टाकावे.
- आंतरमशागत : पुर्नलागवड भात : लागवड पद्धतीच्या भात शेतीमध्ये पुर्नलागवडीनंतर दोन ते तीन बेनण्या आवश्यक असतात. ५ ते ६ सें.मी. पाणी भात शेतात साठवून उत्कृष्टपणे तण नियंत्रण करता येते. रासायनिक तण नियंत्रणासाठी२० ग्रॅम मेटसल्फुरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरोम्युरॉन इथाईल १० टक्के तयार मिश्रण ०.००४ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात पुर्नलागवडीनंतर १५ ते २० दिवसांत फवारावे व त्यानंतर ४५ व्या दिवशी एक खुरपणी करावी.
- पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरिता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी.
  १. रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ सें.मी.
  २. रोपांच्या वाढीच्या प्राथमिक अवस्थेत २ ते ३ सें.मी.
  ३. अधिक फुटवे येण्याच्या अवस्थेत ३ ते ५ सें.मी.

### पीक संरक्षण

- करपा, पर्णकोष कुजव्या, पर्ण करपा, तपकिरी ठिपके, दाणे रंगहिनता, आभासमय काजळी आणि पर्णकोष करपा या रोगांचा प्रादुर्भाव दिसल्यापासून प्रोपीकोनॅझोल २५ ई.सी. किंवा मॅन्कोझेब ५ डब्लु. पी. (०.२५%) या बुरशीनाशकांच्या १५ दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या घ्याव्यात.
- करपा रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी प्रादुर्भाव दिसल्यापासून ट्रायसायक्लॅझोल ७५ डब्लु.पी.किंवा क्रेसॉक्झीम मिथाईल ४४.३ एस.सी. (प्रत्येकी ०.१%) किंवा टेबुकोनॅझोल २५.९ ई.सी. (०.१५%) किंवा कासुगामायसीन ३ एस.एल. (०.१५%) किंवा हेक्झाकोनॅझोल

(०.२०%) या बुरशीनाशकांच्या १५ दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या घ्याव्यात.

- खोडकीड, पाने गुंडाळणारी अळी, गाद माशी व तपकिरी तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी दाणेदार कारटाप हायड्रोक्लोराईड ४% (२५किलो) किंवा फिप्रोनील ०.३% (२५ किलो) लागवडीनंतर १ महिन्यानी प्रती हेक्टरी या प्रमाणात जमिनीत मिसळावे.

## नाचणी

- पेरणीची वेळ : जून/जुलै
- पेरणीची पद्धत : पुर्नलागण/पेरणी
- मार्करच्या सहाय्याने रेषा पाडणे
- बियाणे (कि.ग्रॅ/हे.) : पुर्नलागण – ३ किलो/हेक्टरी
- पेरणी पद्धत : ५ किलो/हेक्टरी
- लागवडीचे अंतर : ३० – १० सें.मी.
- पेरणीची खोली : २ सें.मी. पर्यंत
- नांग्या भरणे / विरळणी करणे
- पुर्नलागणीची पद्धत : गादी वाफ्यात तयार केलेली २५–३० दिवसांची रोपे वापरतात.
- रासायनिक बीजप्रक्रिया : नाचणी पिकाची धुळवाफ पेरणी करीता प्रति किलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम फॉलीडॉल भुकटी लावावी. रोग नियंत्रणासाठी प्रति किलो बियाणांस २.५ ग्रॅम कार्बनडेंझीम प्रक्रिया करावी.
- बियाणे संस्करण : बियाणे पेरणीपुर्वी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरिलम ब्रासिलेन्स + स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रिया करावी.
- खतमात्रा
  १) रासायनिक खतमात्रा : ६०:३०:३० कि. नत्र, स्फुरद, पालाश/ हे. युरिया १३० कि. (२.८८ गोणी), सिंगल सुपर फॉस्फेट १८७ कि. (३.७४ गोणी), म्युरेट ऑफ पोटॅश ५० कि. (१ गोणी)
  २) पेरणीच्यावेळी ३० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश प्रति हेक्टर द्यावे.
- उप–पर्वतीय विभागातील हलक्या जमिनीत, अधिक तुपादन व आर्थिकफायद्यासाठी नाचणी पिकाची रोपलागण २०:४० से.मी. जोड ओळीत करून ५.० टन शेणखत प्रति हेक्टरी + शिफारसीत खत मात्रेच्या ७५ टक्के खत मात्रा (४५: २२.५ :०० नत्र: स्फुरद: पालाश किलो/ हेक्टरी) गोळी (ब्रिकेट) स्वरुपात रोप लावणीचे वेळी (२० सेमीच्या जोड ओळीत ३५ सेमी अंतरावर ५ ते ७ से.मी. खोलीवर २.७ ग्रमची एक गोळी) देण्याची शिफारस करण्यात आली आहे
- महाराष्ट्राच्या उप–पर्वतीय विभागात नाचणीच्या अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी प्रति हेक्टर ५ टन शेणखत + नत्र ६० किलो, स्फुरद ३० किलो आणि पालाश ३० किलो या खत मात्रेसोबत जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया (प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रम अझोस्पिरीलम ब्रासिलेंस आणि अस्पर्जीलस अवामोरी) करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## सोयाबीन

- स्पोडोप्टेरा या पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी एक हेक्टर पिकात ५ कामगंध सापळे लावावेत.
- पेरणीनंतर २० ते २५ दिवसानी पिवळा मोझॅक या रोगाच्या प्रतीबंधासाठी पांढऱ्या माशीचे नियंत्रण करणे गरजेचे असते. त्यासाठी पिकात पिवळे चिकट सापळे एकरी १० लावावेत.
- रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच थायमिथोक्झाम २५ % डब्लू जी या किटकनाशकाची १०० ग्रॅम प्रती हेक्टरी फवारणी करावी. प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळून आल्यास ती उपटून नष्ट करावीत.

## फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – रस शोषणाऱ्या किडी, तेलकट डाग रोग व बुरशीजन्य रोगांचे नियंत्रण करावे.
- सिताफळ – संकरीत जातीमध्ये कृत्रिम परागीभवन करावे. सिताफळावरील पिठया ढेकुण नियंत्रणासाठी जैवीक उपाय योजना करावी.
- बोर – नवीन फुटीच्या फांद्याची संख्या मर्यादीत ठेवुन झाडांना वळण देणे.
- आवळा – फुल धारणा व फळ धारणेच्या वेळी फळ पोखरणारी अळी व बी खाणाऱ्या भुंगेऱ्यांचे नियंत्रण करावे.
- पेरू – रसशोषक किडींसाठी जैविक किडनाशकांचा वापर करावा.
- कागदी लिंबू – पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे. आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी. सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
- कँकर / खैऱ्या रोग : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी किंवा कार्बेनडॅझिम १३% + मॅनकोझेब ६३% डब्ल्युपी २ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारावे.
- शेंडेमर : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाणी

## भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांची काढणी करावी.
- उन्हाळी वांगी, मिरची, टोमॅटो पिकाची काढणी करावी.
- खरीप हंगामातील भाजीपाला पिकाचे लागवडीसाठी रान बांधणीकरावी.लागवडीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- रासायनीक खत मात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळी द्यावे.
- टोमॅटोचे ३ ते ४ आठवडे कालावधीचे रोप लागवडीस वापरावे.
- वांगी व मिरची पिकाचे सहा आठवडे कालावधीचे रोपे लागवडीसाठी वापरावे.
- लागवडीपूर्वी टोमॅटो, वांगी, मिरची, फ्लॉवर व कोबी रोपांची मुळे किटकनाशक, बुरशीनाशक तसेच जीवाणू खताचे द्रावणात बुडवावे.
- कांदा पिकाचे रोपवाटीकेतील रोपांचे किड व रोगापासून संरक्षण करावे.
- कांदा पिकाचे लागवडीसाठी शेत तयार करावे.
- फ्लॉवर व कोबीचे सहा आठवड्याचे रोपे लागवडीस वापरावे.
- खरीप हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी उदा. दुधी भोपळा, कारली, दोडका, घोसाळी, तांबडा भोपळा इ.
- खरीप भेंडी व गवार पिकांची लागवड करावी.
- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.
- रांगडा कांदा लागवडीसाठी बियांची गादी वाफ्यावर पेरणी शेवटच्या आठवड्यात करावी.

## आले

- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.
- कंदमाशीचे नियंत्रण करावे: आले पिकास कंदमाशीसारख्या किडीचा मोठा उपद्रव होतो. या किडीची माशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर रंगाची असते. माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून त्यावर राखी रंगाचे ठिपके असतात. अंडी पांढरट रंगाची असतात. अळी पिवळसर असून त्यांना पाय नसतात. या किडीच्या अळया उघडया गड्ड्यामध्ये शिरुन त्याच्यावर उपजिवीका करतात.
- कंदमाशी नियंत्रणासाठी कंदमाशी शेतामध्ये दिसू लागल्यावर माशा मारण्यासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. १० लिटर पाण्यामध्ये किंवा डायमेथोएट १५ मि.ली. प्रति १०लि. पाण्यामध्ये मिसळून जुलै ते ऑगस्ट दरम्यान आलटूनपालटू न १५ दिवसांच्या

अंतराने फवारण्या कराव्यात त्यानंतर क्विनॉलफॉस ५ टक्के किंवा फोरेट १० टक्के दाणेदार हेक्टरी २० किलो या प्रमाणात झाडाच्या बुध्यांभोवती पसरून टाकावे व पाऊस न पडल्यास लगेच उथळ पाणी द्यावे. याच किटकनाशकाचे पुढील दोन हप्ते १ महिन्याच्या अंतराने ऑगस्ट व सप्टेंबर द्यावेत. अर्धवट कुजके, सडके बियाणे लागवडीस वापरु नये. जुलै ते सप्टेंबर या कालावधीमध्ये शेतात उघडे पडलेले गड्डे मातीत झाकून घ्यावेत.

## मुरघास

❖ हिरव्या वैरणीतील उपलब्ध पोषणमुल्य घटकांचे जतन करणेसाठी, हिरव्या वैरणीची प्रत व दर्जा कायम राखण्यासाठी, अतिरिक्त हिरवी वैरण योग्य वेळी कापणी करून वैरणीत ३० टक्के शुष्कांश व ७० टक्के आर्द्रता असतांना कुट्टी करून खड्ड्यात किंवा पिशवीत हवाबंद स्थितीत (एनोरोबीक कंडीशन) मुरण्यासाठी / आंबविण्यासाठी साठविली जाते. या हिरव्या वैरणी साठविण्याच्या/टिकविण्याच्या पध्दतीला मुरघास बनविणे संबोधले जाते.

### ❖ मुरघास बनविण्याचे उद्देश :

❖ अतिरिक्त हिरव्या वैरणीतील पोषणमुल्य घटकांचे जतन करणे, यासाठी हवाबंद पध्दतीने वैरण आंबविणे.

❖ हिरव्या वैरणीच्या कमतरतेच्या काळात (हिरव्या वैरण उपलब्धतेच्या टंचाई कालावधीत) हिरव्या वैरणीला पर्याय म्हणून, मुरघास तयार करून पशुधनासाठी पोषणमुल्य असलेली वैरण उपलब्ध करणे.

❖ हिरवी वैरण उत्पादनासाठी वारंवार येणाऱ्या उत्पादन खर्चात बचत करणे.

❖ पशुधनासाठी पोषणमुल्य असणारी वैरण दीर्घकाळ (मुरघासाचे आग, पाणी, ओलावा, बुरशी व इतर घटक या पासून संरक्षण घेण्याची काळजी घेतल्यास ४ ते ६ महिने व जास्तीत जास्त २८ ते ३० महिन्यांपर्यंत) साठवून टंचाई काळात वापर करता येतो.

❖ वैरण हाताळतांना / साठवतांना होणारी तूट कमी राखता येते.

❖ मुरघास पध्दतीने वैरणीची प्रत / दर्जा कायम राखता येतो.

❖ पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्याने अतिरिक्त हिरवी वैरण वाळवून साठवण करणे अडचणीचे जाते. अशावेळी वैरणीचे मुरघासात रूपांतर करून वैरणीचे नुकसान टळते. वैरण कमी जागेत साठवून टिकविता येते.

## गो संवर्धनात अत्याधुनिक यंत्रांचा वापर

देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात चारा कापणी व कुट्टी करून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरण्यासाठी ट्रॅक्टर संचलित फोरेज हार्वेस्टरचा वापर केला जातो, तसेच चारा कापणीसाठी ट्रॅक्टर माउंटेड फ्रंट रिपर, लसूणघास कापणी यंत्र, जनावरांचे पशुखाद्य पेंड तयार करण्याचे यंत्र, चाऱ्याची कुट्टी करून साईलेज बॅग भरण्याचे यंत्र, पिकांमध्ये फवारणी करण्यासाठी स्लरीगाडा, जनावरांचे दुध काढण्यासाठी मिल्किंग मशीन व दुध पॅकिंग करण्यासाठी स्वयंचलित दुध पॅकिंग मशीन, शेणापासून पाणी व घनपदार्थ वेगळे करण्यासाठी डीवॉटरिंग मशीन, शेणापासून लाकुड (गोकाष्ठ), स्फुरद समृद्ध सेंद्रिय खत (PROM) बनविण्याची यंत्रे, शेणापासून मूर्ती, दिवे, मोबाईल स्टँड, इ. बनविण्याचे साचे, इ. अनेक प्रकारची यंत्रे / उपकरणे उपलब्ध आहेत. आजारपण, अपघात इत्यादींमुळे बसलेल्या गाईला उचलण्यासाठी हायड्रोलिक काऊ लीफ्टर, मॅनुअल काऊ लीफ्टर व ट्रॅवीस (खोडा) देखील उपलब्ध आहेत.

प्रकाशक : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

प्रमुख संपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

सहसंपादक : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

डिझाईनर : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७९१/२०२५